| MHJN060012262023 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १७८/२०२३**<br>**मंगलाबाई –वि– कस्तुराबाई व इ.**<br>**निशाणी क्रमांक ०५ वर आदेश पारीत** |
|---|---|

१) सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे विरुध्द तुर्तातूर्त मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

२) प्रस्तुत अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे विरुध्द मौजे–मोहळाई, ता. भोकरदन येथील गट क्रमांक १६ क्षेत्र ५ हे. ४४ आर. पैकी वादपत्रामध्ये नमूद चतुःसिमांकीत ८३ आर. क्षेत्राबाबत मालकी जाहीर होऊन मिळणेसाठी व निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला असून प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी वादी यांचे दावा मिळकतीचे कब्जे वहितीस प्रस्तुत दाव्याचा न्यायनिर्णय होईपर्यंत हरकत अडथळा करु नये, म्हणून तुर्तातूर्त मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला असून, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी नि.क्र.११ येथे कैफियत, प्रतिदावा व म्हणणे दाखल करुन प्रस्तूत अर्जास विरोध दर्शविलेला आहे.

३) वादी यांची तुर्तातूर्त मनाई अर्जातील कथने तसेच प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे म्हणण्यातील कथने तसेच वादीतर्फे सन्माननीय विधीज्ञ व प्रतिवादी क्र.१ ते ६ तर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवादाचे अवलोकन करुन, खालील वादप्रश्न या न्यायालयाचे निदर्शनास आले. सबब, हे न्यायालय खालील वादप्रश्नांचे

त्याखाली दिलेल्या कारणांसहित निष्कर्ष नोंदवले आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजुने आहे, असे वादी शाबित करतात काय ? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादी यांचे बाजुने आहे असे वादी शाबित करतात काय ? | नकारार्थी |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे काय ? | नकारार्थी |
| ४. | अंतिम आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## :: का र ण मि मां सा ::

४) सदरचे चारही वादप्रश्न एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याचे विवेचनाची पुनरावृत्ती होवु नये, म्हणुन ते एकत्रीतपणे चर्चेसाठी घेतलेले आहेत.

५) **दावा प्रलंबीत असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजूर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधिन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधिकार वापरताना मा.सर्वोच्च न्यायालय यांनी *Darpat Kumar and another Vs. Pralhad Singh and others (1992) 1 SCC 719* या न्यायनिर्णयामध्ये खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक आहेत असे मार्गदर्शन केले आहे.**

**(अ) वादीला सकृत दर्शनी बाजू आहे काय ?**

**(ब) न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ?**

**(क) अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ?**

६) दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई ताकीदीची समानतेची दाद (Equitable relief) मागणी करीत असतांना वादीतर्फे दावा मिळकतीतील प्रथमदर्शनी कब्जे वहिती शाबीत करणे गरजेचे असते. तसेच वादी यांनी स्वबळावर व दाखल कागदपत्रांच्या आधारे त्यांची प्रथमदर्शनी बाजू शाबीत करणे आवश्यक असते.

७) वादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, दावा मिळकती या प्रतिवादी यांचे पुर्वाधिकारी सुर्यभान पानपाटील यांची इनामी महार हडोळा भोगवटादार वर्ग–२ या प्रकारातील मालकीची मिळकत होती. सदर मिळकतीची खरेदी–विक्री होत नसल्याने सदर सुर्यभान यांनी वादी यांना रक्कम रुपये १००/– चे मुद्रांकावर नोटराईझ दानपत्र प्रतिवादी क्र.३ यांचे समक्ष करुन दिलेले असून तेव्हापासून वादी या सदर मिळकत वहिवाटीत आहेत. त्यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, ७/१२ दप्तरी वादी यांची नोंद नसल्याने सुर्यभान यांचे पश्चात प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी वारसाफेर करुन घेतला व वारसाफेर अन्वये प्रतिवादी हे वादी यांना दावा मिळकतीतून बेदखल करीत आहेत. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे तुर्तातूर्त ताकीद प्रतिवादी यांना देणेत यावी, अशी वादीतर्फे विनंती करणेत आलेली आहे.

८) याउलट, प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला

की, वादी जो दस्तऐवज घेऊन आले आहेत, तो बक्षिसपत्राचा नाही. जिल्हाधिकारीसाो यांची परवानगी काढून वादी खरेदीपत्र करु शकले असते. वादी यांना सदर दस्तऐवजान्वये कोणतीही मालकी प्राप्त होत नाही. वादीतर्फे त्यांची कब्जे वहिती दर्शविणेच्या दृष्टीने कोणताही दस्तऐवज अभिलेखावर नाही. प्रतिवादी यांना दावा मिळकत सुर्यभान यांचे पश्चात वारसाहक्काने आलेली आहे, ज्याचेशी वादी यांचा काहीही संबंध नाही, तरी वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा असा त्यांनी युक्तीवाद केला.

९) सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले. मा.ना. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ***Shamrav Ganpat Chintamani V/s. Kakasa Laxman Gorade, reported in 2008(2) Mh.L.J. 819,*** या न्यायनिर्णयामध्ये खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.

> ***"न्यायालयाने तात्पुरत्या मनाई हुकूमासाठी प्रथमदर्शनी बाजू विचारात घेताना दावा मिळकतीवर वादीचा प्रथमदर्शनी कब्जा वादीने सुस्थापित केला आहे का याबाबत निष्कर्ष नोंदविला पाहिजे".***

१०) प्रस्तुत अर्जाकामी वादी यांनी वरील मार्गदर्शक तत्वानुसान प्रस्तुतची समानतेची दाद मिळणेसाठी त्यांची दावा मिळकतीमधील कब्जे वहिती प्रथमदर्शनी दर्शविणे गरजेचे आहे. वादीतर्फे नि.क्र.४ लगत गट क्र.१६ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. सदर उता–याचे बारकाईने अवलोकन केले असता, दावा मिळकतीस प्रथमदर्शनी भोगवटादार सदरी तसेच वहिवाटदार सदरी वादी यांची कोठेही नोंद

दिसून येत नाही. गट क्रमांक १६ पैकी ६८ आर. क्षेत्रास फेरफार क्र.१२९१ अन्वये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांची नावाची नोंद असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. नि.क्र.४ लगत फेरफार क्र.१२९१ चा उतारा दाखल आहे. सदर उता–याचे बारकाईने अवलोकन केले असता, सुर्यभान बंडु पानपाटील हे दिनांक ०९.०३.२०१७ रोजी मयत झाल्यानंतर दिनांक १४.०९.२०२२ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचा वारसाचा फेर मंजूर झालेला असून त्याप्रमाणे दावा मिळकतीचे ७/१२ दप्तरी ६८ आर. क्षेत्रास नोंद झालेचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

**११)** वादी यांचे कथनाप्रमाणे, सुर्यभान यांनी नोटराईझ मुद्रांकान्वये करुन दिलेल्या दानपत्रान्वये ते दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. वादीतर्फे नि.क्र.१९ लगत सदर दानपत्र व शपथपत्र दाखल केलेले आहे. सदर दानपत्राचे प्रथमदर्शनी अवलोकन केले असता, गट क्र.१६ पैकी २ एकर ३ गुंठे क्षेत्राची मिळकत सुर्यभान यांनी वादी यांना दान केल्याचे त्यात नमूद आहे. प्रथमदर्शनी सदर दस्तऐवजाचे अवलोकन केले असता, सदरचा व्यवहार हा कोणताही मोबदला न घेता दानपत्राचा दिसून येतो. परंतू संपत्ती हस्तांतरण अधिनियम, १९८२ चे कोणते तरतुदींन्वये सदरचा दस्तऐवज कायदेशीर आहे व त्याअन्वये वादी यांना मालकी प्राप्त होते, याचे प्रथमदर्शनी कोणतेही संयुक्तीक उत्तर वादीतर्फे देणेत आलेले नाही. कायद्याप्रमाणे नोंदणीकृत खरेदीपत्रान्वये तसेच नोंदणीकृत बक्षिसपत्रान्वये एखादी मिळकतीची मालकी ही हस्तांतरीत होते. परंतू अभिलेखावर प्रथमदर्शनी असा कोणताही दस्तऐवज नाही. त्याच बरोबर वादी यांची प्रथमदर्शनी कब्जे वहिती शाबीत

करणेच्या दृष्टीने अभिलेखावर कोणताही दस्तऐवज दाखल नाही. वादी यांची ७/१२ दप्तरी कब्जेदार सदरी, भोगवटादार सदरी नोंद दिसून येत नाही. वादीतर्फे कब्जे वहिती दर्शविणेच्या दृष्टीने अशोक पानपाटील व भगवान मुळे यांची शपथपत्रे दाखल केलेली आहेत. परंतू प्रतिवादीने देखील त्यांची कब्जे वहिती दर्शविणेच्या दृष्टीने संतोष पानपाटील यांचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे केवळ वादी यांच्या दाखल सदर दोन शपथपत्रांवरुन वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी कब्जे वहिती शाबीत केली, असे होणार नाही. याउपर, ७/१२ दप्तरी सुर्यभान यांचे नावे केवळ ६३ आर. क्षेत्र दिसून येते. अशा परिस्थितीमध्ये सुर्यभान यांनी वादी यांना ८३ आर. क्षेत्र कसे दान केले, हा प्रश्न देखील उपस्थित होतो.

**१२)** एकंदरीत अभिलेखावरील प्रथमदर्शनी पुराव्यावरुन वादी यांना प्रथमदर्शनी बाजू दिसून येत नाही. वादी यांनी त्यांची प्रथमदर्शनी कब्जे वहिती शाबीत केलेली नाही. न्यायाचा समतोल वादींचे बाजुने नाही. ७/१२ दप्तरी वारसाहक्काने गट क्र.१६ पैकी ६३ आर. क्षेत्रास प्रतिवादी यांची नावे दिसून येतात. याउपर, प्रथमदर्शनी मालकी व कब्जे वहिती दर्शविणेच्या दृष्टीने वादीकडे कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा नाही. त्यामुळे तुर्तातूर्त ताकीद दिली नाही, तर वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असे हे न्यायालय अनुमान नोंदवित आहे. त्यामुळे वादी यांचा सदर तुर्तातूर्त ताकीदीचा अर्ज फेटाळणे न्यायोचीत होईल. ***सबब, वादप्रश्न क्रमांक १ ते ३ चे उत्तर हे न्यायालय नकारार्थी नोंदवत असून, वादप्रश्न क्रमांक ४ चे उत्तराकरीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.***

# // आ दे श //

| | |
|---|---|
| १) | वादी यांचा निशाणी क्रमांक ०५ वरील तुर्तातूर्त मनाई ताकीदीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |
| २) | अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो. |

Digitally signed by DESHPANDE CHAITANYA SUNILDATTA
Date: 2024.08.06 15:54:05 +0530

ठिकाण: भोकरदन.
दिनांक: ०६/०८/२०२४.

(सी.एस. देशपांडे)
सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन.